फक्त सभासदांसाठी
वर्ष ४२वे, अंक ८वा ❋ डिसेंबर २०२३

सभा : मंगळवारी संध्या. ७.०० वा.
SNDT महाविद्यापीठ, रोटरी हॉल,
कर्वे रोड, पुणे ३८

# स्नेह सेवा

## मैत्रेय चॅरिटेबल सोसायटी, पुणे

नोंदणी क्र. MAH /1528/06/Pune, दिनांक ७ सप्टेंबर २००६

❋ अध्यक्ष ❋
नीलिमा भडभडे
मो. ९७६७९१६५४०

पत्रव्यवहारासाठी पत्ता :
द्वारा-प्रबोध, १०७०, शुक्रवार पेठ, सुभाषनगर लेन नं. ६, पुणे ४११००२.
snehseva1981@gmail.com

❋ संपादक ❋
नीलिमा भडभडे
मो.९७६७९१६५४०

## सैनिकस्नेह २०२३

सैनिकस्नेह हा स्नेहसेवाचा आणि मैत्रेय चरिटेबल सोसायटी चा जुना, प्रतिष्ठेचा, मानाचा प्रकल्प. सर्व सभासद तो सुरू करण्याची वाट पाहतात आणि प्रकल्पाची सुरुवात करण्याची घोषणा केल्याबरोबर काम करण्यासाठी पुढे येतात.

२०२३ दिवाळीच्या या कामाची जबाबदारी डॉ दिनेशकुमार पांडे यांनी स्वीकारली. आर्की. विश्वकुमार बडवे यांच्या ऑफिस मध्ये आणि त्यांच्या मार्गदर्शनाखाली प्रकल्पाची आखणी झाली. भारताच्या पश्चिम, उत्तर आणि पूर्व भागातील सैन्याचे बटालियन मध्ये संपर्क साधण्यासाठी मार्ग शोधले.

मागच्या वर्षीपेक्षा सैन्याच्या अधिक युनिट्सना मिठाई पाठवायची असे ठरले. त्यासाठी लागणारा अधिक निधी जमा करू असा विश्वास वाटत होता. आपल्या वेबसाईट मधून देणग्या मिळवण्यासाठी पेमेंट गेटवे जोडण्याचे काम सुरू केले, जेणेकरून जगातील कोणत्याही भागातून आणि दात्याच्या सर्व माहितीसह देणग्या मिळतील. डॉ पांडे यांनी युनिट्समधील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधला, आणि सर्व मिळून ६५०० मिठाईचे डबे पाठवायचे, आणि ५०० डबे खडकी येथील पुनर्वसन केंद्र आणि क़्वीन मेरी इन्स्टीट्यूटला द्यावयाचे ठरले.

श्री अविनाश जोशी यांनी चितळे बंधूंबरोबर मिठाईच्या बाबी ठरविल्या. श्री सुधीर पळसुले यांनी पूर्व भागामध्ये विमानाने मिठाई पाठविण्याची जबाबदारी स्वीकारली. सौ. सुनिता वाघ यांनी पुण्यातल्या शाळांना पत्रे पाठवली.

पुण्यातल्या इंग्रजी-हिंदी-मराठी-हिंदी माध्यमांच्या २२ शाळांमधून अत्यंत सुंदर चित्र काढलेली, फुले-टिकल्या आदींनी सजविलेली भेटकार्डे गोळा झाली. मिठाईच्या डब्यांबरोबर ही भेटकार्डे पाठवली.

स्नेहसेवाच्या सभासदांनी देणग्या दिल्या, आणि मिळविल्या. अनेक वर्षे या कार्यासाठी देणग्या देणारे हात देखील संपर्क केल्यावर लागलीच पुढे आले. चितळे बंधू यांचा सहभाग मोठा होता. या प्रकल्पासाठी लागणारा निधी दिवाळीपर्यंत जमला सुद्धा. श्री अरविंद भडकमकर यांनी बँकेत जमा रकमा, देणगीदारांकडून प्राप्त झालेली माहिती आणि बँक अहवालाबरोबर रकमा जुळवून पावत्या करणे हे अत्यंत अवघड व जिकीरीचे काम केले, अजूनही करत आहेत.

सैनिकस्नेह प्रकल्पाचा मुख्य कार्यक्रम ५ नोव्हेंबर २०२३ ला निवारा येथे झाला. अनेक सदस्यांनी कार्यक्रमाची जबाबदारी स्वीकारली. या कार्यक्रमाला देणगीदार देखील उपस्थित होते. उत्तरेकडील सैन्याच्या युनिट्सचे प्रतिनिधी जवान उपस्थित होते, त्यांनी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते मिठाई स्वीकारली. पुढे ही मिठाई ते झेलम एक्स्प्रेस ने घेवून गेले. सर्व मिठाई दिवाळी सुरू होण्यापूर्वी जवानांना पोहोचली.

क्वीन मेरी इन्स्टिट्यूट व खडकी पॅराप्लेजिक रिहॅबिलिटेशन सेंटर मध्ये सदस्यांनी तेथील जवान विद्यार्थ्यांबरोबर दिवाळी साजरी केली. जवानांसाठी कार्यक्रम सदर केले आणि दिवाळी मिठाई व भेटकार्डे दिली.

डॉ दिनेशकुमार पांडे आणि त्यांच्या टीमचे कौतुक आणि आभार.

**नीलिमा भडभडे**

## सैनिक-स्नेह समारंभ

सैनिक-स्नेह समारंभ ५ नोव्हेंबरला निवारा मध्ये झाला. अध्यक्षा डॉ. नीलिमा भडभडे यांनी सन्माननीय पाहुणे लेफ्ट. जन. माधुरी कानिटकर (निवृत्त) आणि लेफ्ट. जन. राजीव कानिटकर (निवृत्त), आणि चितळे समूहाचे प्रमुख श्रीकृष्ण चितळे यांचे स्वागत आणि सत्कार केला.

अध्यक्षा नीलिमा भडभडे यांनी स्नेहसेवा संस्था कधी आणि कोणत्या हेतूने स्थापन झाली हे सांगितले. दर मंगळवारी होणारे स्नेहसेवाचे कार्यक्रम, समाजासाठी संस्थेचे कार्य, शैक्षणिक प्रकल्प, आरोग्य प्रकल्प आणि सर्वात मानाचा सैनिकस्नेह प्रकल्प अशा प्रकारे संस्थेचे कार्य कसे चालते ते वर्णन केले.

आर्की. विश्वकुमार बडवे यांनी सैनिकस्नेह प्रकल्प कसा सुरू झाला आणि त्यानंतर या कामाचा विस्तार कसा वाढत

गेला ते सांगितले.

सुधा जावडेकर यांनी दोन्ही सन्माननीय पाहुण्यांची ओळख करून दिली. लेफ्ट. जन. डॉ. माधुरी कानिटकर (निवृत्त), PVSM, AVSM, VSM, या सध्या महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठच्या कुलगुरू आहेत. आर्म्ड फोर्सेस मेडिकल कॉलेज, पुणे येथून एम.बी.बी.एस. झाल्या, सर्व वर्षात प्रथम क्रमांक मिळविला व राष्ट्रपती पारितोषिक मिळाले. तेथेच पुढे अधिष्ठाताही झाल्या. Pediatric Nephrology मध्ये एम.डी. केले. लेफ्ट. जन. राजीव कानिटकर (निवृत्त), PVSM, AVSM, SM, VSM, राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी मधून १९७७ मध्ये पूना हॉर्स आर्मर्ड रेजिमेंट मध्ये रुजू झाले. १९९९-२००१ मध्ये कारगिल भागात कार्य. आर्मर्ड ब्रिगेडचे कमांडंट, आणि इन्फंट्री विभागाचे मेजर जनरल म्हणून आणि स्ट्राईक फोर्सचे लेफ्टनंट जनरल म्हणून प्रमुख होते. क्वार्टर मास्टर जनरल म्हणून निवृत्त झाले.

प्रमुख पाहुणे ले.ज. माधुरी कानिटकर यांनी सांगितले की, मिठाई बॉक्स जवानांपर्यंत पोहोचतात त्याचा जवानांना आनंद असतो आणि शालेय मुलांनी केलेली भेटकार्डे मिळाल्याचाही आनंद होतो. यामध्ये आपल्या पलीकडे दुसऱ्यांचा विचार करण्याची वृत्ती असते. जवानांना दिवाळीतही ड्यूटी असते, आणि सेनेमध्ये सगळे धर्म समान असतात त्यामुळे सगळेच सण साजरे होतात.

कोव्हिड काळाबद्धल ले.ज. माधुरी कानिटकर यांनी सांगितले की, कोविड बद्दल कोणालाही काहीही माहीत नव्हती. सार्वजनिक आरोग्य प्रणाली किंवा प्राथमिक आरोग्य सेवांमध्ये याविषयी कोणत्याही सोयी गावांमध्ये नव्हत्या. आपली काहीही तयारी नसताना हा (सार्स कोविड) शत्रू भारतात घुसला. त्यावेळी लॉकडाऊन केला हे फार चांगले झाले. कोविड टेस्ट करण्यासाठी आपल्याकडे नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ व्हायरोलॉजी या एकाच ठिकाणी सोय होती, पण त्यानंतर भारतात साठ टेस्टिंग लॅब्ज उभ्या राहिल्या. कॉवॅक्सीन, कोवीशील्डयांसारखी पाच वॅक्सीन भारतात तयार झाली. सर्व जगात वॅक्सीनचा तुटवडा असताना भारताने या वॅक्सीन जगातील अनेक देशांना उपलब्ध करून जगातील अनेकांचे जीव वाचवले, आणि अशा तऱ्हेने भारतीय तत्वज्ञानातील वसुधैव कुटुंबकम चे महत्त्व अधोरेखित केले.

ले.ज. माधुरी कानिटकर यांना वेगवेगळी आव्हाने स्वीकारून ती पेलायला आवडते. भारत सरकारने कोविड काळात को-जीतचे नेतृत्व ले.ज. माधुरी कानिटकर यांच्याकडे सोपविले त्याबद्द्ल माहिती देताना त्या म्हणाल्या की, कोविडबद्दल काहीही माहिती नव्हती, आणि सरकारला जलद उपाय हवे होते. तेव्हा आर्मीने तीन आठवड्यात जंबो हॉस्पिटले तयार केली, रेल्वे बोगींमध्ये हॉस्पिटल-ऑन-व्हील्स तयार केली. जवान आजारी पडू नयेत यासाठीही योग्य काळजी घेतली. संघभावानेतून सर्व कामे चांगली होतात या विश्वासाने त्यांनी वेगवेगळ्या टीम्स करून त्यांना कामे वाटून दिली. डिजिटल मदतही घेतली. आर्मी, नेव्ही, एअरफोर्स या सर्वांचे सहकार्य घेऊन को-जीत ने कोविडचा यशस्वी सामना केला. कोविड मधील या कामामुळे त्यांच्या कारकिर्दीतील हा काळ त्यांच्यासाठी संस्मरणीय होता. आरोग्य विज्ञान विद्यापीठात कुलगुरू म्हणून ई-लायब्ररी सुरू करून ज्ञान व माहिती सर्वांकडे पोहोचविण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

त्यानंतर ले.ज. माधुरी व ले.ज. राजीव कानिटकर यांच्या हस्ते तेथे आपापल्या सेनेतील युनिटतर्फे उपस्थित असलेल्या जवानांना मिठाईचे डबे व भेटकार्डे देण्यात आली.

सैनिक स्नेह प्रकल्पाचे प्रमुख डॉ. पांडे यांनी चितळे बंधूंच्या सहकार्याने आपण या मिठाई बॉक्सेस जवानांना देऊ शकतो हे नमूद केले.डॉ. पांडे यांनी सांगितले की, दरवर्षी हा प्रकल्प वाढत आहे. सैनिकस्नेह प्रकल्पाची तयारी चार महिने आधीपासून सुरू असते. ६५ शाळां मधील विद्यार्थी दीपावली कार्ड्स तयार करतात. सर्वांच्या सहकार्याने यावेळी १० बटालियनस् ना आपण मिठाई पाठवत आहोत. आपल्या २०० पेक्षा जास्त देणगीदारांच्या सहकार्यामुळे हे शक्य होते.

प्रमुख पाहुणे ले.ज. राजीव कानिटकर यांनी भाषणात सांगितले की, जवानांना कायम सतर्क राहावे लागते. लडाख, काश्मीर सारख्या अशांत टापूत काम करावे लागते. पुढे ते म्हणाले लडाखमध्ये रसदीची व्यवस्था (logistics) याचे खूप महत्वाचे पण अवघड काम आहे. तेथील हवामान, भूस्खलन, हवेचा कमी दाब ही सर्व आव्हाने पेलत हे काम करावे लागते. आर्मीतील सर्व धर्माचे लोक देशासाठी एकत्र काम करतात तेथील शिस्त, अनुशासन, कोणतेही काम बरोबरच करायचे हे सर्व गुण देशातील सर्व लोकांनीही आत्मसात करणे आवश्यक आहे, तरच आपल्या देशाला विकसित देश म्हणता येईल हे त्यांनी निग्रहाने सांगितले. शिस्त आणि आत्मविश्वास याचे महत्व मोठे आहे असे थांनी सांगितले, आणि ते स्वतः मोठ्या आजारातून केवळ याच बळावर बाहेर कसे पडले हे सांगितले.

उपस्थित जवानांनी स्वतःचे अनुभव सांगितले. त्यांना येणाऱ्या अडचणी, घरापासून वर्षानुवर्षे लांब राहावे लागणे, हे सर्व किती क्लेशकारक असते, ते सांगून ते म्हणाले की स्नेहसेवाकडून दीपावलीत जी मिठाई मिळते त्यामुळे जनता आपल्या पाठीशी आहे असे त्यांना वाटते.

चितळे बंधूंचे श्री. श्रीकृष्ण चितळे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की मिठाई मिळाल्यावर जवानांचे फोन येतात त्याचा विशेष आनंद होतो.

शाम भुर्के यांनी समारोप केला. स्नेहसेवा ही इतर संस्थेपेक्षा कशी वेगळी आहे हेही सांगितले. श्री. चितळे

यांनी जी अनेक कामे केली त्याची प्रशंसा केली व सर्व देणगीदारांचे आभार मानले. ले.ज. कानिटकर यांच्या हस्ते मिठाई वाटप झाल्याने या प्रकल्पाची उंची वाढली असे मत त्यांनी व्यक्त केले.

यानंतर स्नेहसेवातर्फे सर्वांना भोजन देण्यात आले व या कार्यक्रमाची समाप्ती झाली.

**अविनाश गोहाड**

## क्वीन मेरी टेक्निकल इन्स्टिटयूट भेट

दर वर्षी प्रमाणे स्नेहसेवेच्या सैनिकस्नेह उपक्रमाअंतर्गत आपल्या सदस्यांनी ९ नोव्हेंबर २०२३ रोजी रेंज हिल्स येथील क्वीन मेरी टेक्निकल इन्स्टिट्यूट खडकी या संस्थेत तेथील विद्यार्थी-जवानांबरोबर दिवाळी साजरी केली.

क्वीन मेरीज टेक्निकल इन्स्टिट्यूटची स्थापना लेडी मेरी विलिंग्डन यांनी मुंबई येथे १९१७ मध्ये केली होती. १९२२ मध्ये खडकी - पुणे येथे संस्था आली. ही संस्था सशस्त्र दलातील अपंग सेवारत आणि माजी कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीनंतरच्या पुनर्वसनासाठी व्यावसायिक व सह-व्यावसायिक प्रशिक्षण देते.

दिवाळीच्या कार्यक्रमास इन्स्टिट्यूटचे प्रमुख कर्नल वसंत बल्लेवार, व सौ. बल्लेवार उपस्थित होते. इन्स्टिट्यूट मधील इतर अधिकारी व विद्यार्थी-जवान आणि त्यांच्या कुटुंबियांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला. स्नेहसेवाचे २५ सदस्य उपस्थित होते.

इन्स्टिट्यूटच्या प्रार्थनेनंतर इन्स्टिट्यूट तर्फे श्री. शिंदे यांनी सर्वांचे स्वागत केले. स्नेहसेवातर्फे डॉ. पांडे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हाती घेतले व सर्वांनी स्नेहसेवेची प्रार्थना गाईली. स्नेहसेवाच्या अध्यक्षा डॉ. भडभडे यांनी प्रास्ताविक केले व संस्थेचा अल्प परिचय करून दिला.

सौ. संध्या भडकमकर, सौ. सुनीता वाघ, सौ. गीता भुर्के आणि सौ. विजया खोले यांनी राष्ट्रभक्तीपर समरगीत 'हा देश माझा याचे भान राहू द्यावे' याचे सामूहिक गायन करून सर्वांचा उत्साह द्विगुणित केला. उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटाने दाद दिली. त्यानंतर डॉ. पांडे यांनी सैनिक-स्नेह उपक्रमाचा आढावा सादर करीत उपक्रमाची व्याप्ती कशी वाढवली हे सांगितले. त्यानंतर स्नेहसेवा तर्फे मनोरंजन आणि प्रबोधनपर कार्यक्रम सदर केले.

श्री. माधव बांदिवडेकर यांची नात चि. स्वरा बांदिवडेकर हिने 'जयोस्तुते श्री महन्मंगले' हे गाणे गाऊन सर्वाना मंत्रमुग्ध केले. श्री. विजय बागुल यांनी माऊथ ऑर्गन वर 'लटपट लटपट तुझं चालणं ग मोठ्या नखऱ्याचं', 'पान खाये सैयां हमारो' व 'मेरा नाम चिन चिन चू' ही सदाबहार गाणी पेश केली. श्री. शामराव भुर्के यांनी सर्व उपस्थितांना सहभागी करून हास्यक्लबचे व्यायाम करून घेतले. या उपक्रमात सर्व उपस्थित, सैनिक, त्यांचे कुटुंबीय व मुले, मोठ्या उत्साहाने सामील झाली. डॉ. राधा संगमनेरकर यांनी सर्वाना डान्स थेरपीचा उपक्रम म्हणून नृत्य करायला लावली. उपस्थितांनी या ही प्रकाराला मोठा प्रतिसाद दिला. सर्व लहान मुले सभागृहात पुढे येउन मनसोक्त नाचली.

इन्स्टिट्यूट चे प्रमुख कर्नल वसंत बल्लेवार यांनीही माऊथ-ऑर्गन वर 'है अपना दिल तो आवारा' आणि इतर गाणी वाजवून उपस्थितांचे हृदय जिंकले. इन्स्टिट्यूटच्या सांस्कृतिक केंद्रातर्फे जवानांनी गाणी सादर केली व त्यांच्या मुलांनी अतिशय आकर्षक नृत्ये सादर केली. उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटाने याला दाद देऊन मुलांचे कौतुक केले.

स्नेहसेवा व मैत्रेय चॅरिटेबल सोसायटी तर्फे जवानांना मिठाई व भेटकार्डे दिली. दोन्ही संस्थांनी एकमेकांचे आभार मानल्यावर चहापानानंतर कार्यक्रम संपला.

**तुषार कसरेकर**

## खडकी पॅराप्लेजिक रिहॅबिलिटेशन सेंटरला भेट

शुक्रवार दि. १० नोव्हेंबर २०२३ ला सकाळी १०.३० वाजता सैनिकांना दिवाळी निमित्त मिठाईचे डबे व भेटकार्ड देण्याकरता पॅराप्लेजिक सेंटर, खडकी, पुणे येथे स्नेह-सेवाचे सभासद जमले. पॅराप्लेजिक सेंटरचे कर्नल रतन मुखर्जी व कर्नल भार्गव त्यावेळी उपस्थित होते.

पॅराप्लेजिक रिहॅबिलिटेशन सेंटर, खडकी हे पाठीच्या कण्यातील दुखापतींसाठी विशेष पुनर्वसन सेवा प्रदान करणारे केंद्र आहे. दक्षिण आशियातील आपल्या प्रकारचे एकच आहे. भारताच्या सशस्त्र दलातील पाठीच्या कण्याच्या दुखापतींमुळे (Spinal Cord Injury) प्रभावित झालेल्या कर्मचाऱ्यांना दुखापतीनंतर सर्वांगीण आणि आजीवन काळजी प्रदान करते. उपचारानंतर प्रभावित कर्मचाऱ्यांना व्हीलचेअरवर बसता येते, आणि गुंतागुंत टाळण्यासाठी त्यांना आयुष्यभर वैद्यकीय सेवा दिली जाते. कुटुंबाची देखील काळजी आणि पुनर्वसन उपलब्ध करून देतात.

कार्यक्रमाचे संचलन डॉ. दिनेश पांडे यांनी केले. १०.३० वाजता स्नेहसेवेच्या प्रार्थनेने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. स्नेहसेवेच्या उपाध्यक्षा डॉ.राधा संगमनेरकर यांनी स्नेहसेवा संस्थेची स्थापना, उद्देश व कार्य याची माहिती उपस्थितांना दिली.

प्रा. श्यामराव भुर्के यांनी आपल्या दिलखुलास शैलीने विविध हास्य प्रकारात उपस्थितांना सामील करून घेतले व सर्वांची मने जिंकली. स्नेहसेवाच्या सर्व सदस्यांनी सशस्त्र दलातील कर्मचाऱ्याना मिठाईचे बॉक्स व भेटकार्ड देऊन

त्यांच्याशी संवाद साधला.

त्यानंतर डॉ. दिनेश पांडे यांनी उपस्थितांचे आभार मानले. अल्पोपहाराने कार्यक्रमाची सांगता झाली.

**प्रवीणा आंबुलकर**

## संगीत संध्या

मराठी व हिंदी गाण्यांची संगीत संध्या २० नोव्हेंबर २३ रोजी संपन्न झाली. 'म्युझिक लव्हर्स' या श्री. उल्हास भानू आणि त्यांच्या सहकारी चमूने हा गायनाचा कार्यक्रम सादर केला. हे सादरकर्ते गायक कलाकार सर्व ज्येष्ठ नागरिक होते. या वयातही या मंडळींनी आपला गाण्याचा छंद यशस्वीपणे जोपासलेला पाहून कौतुक वाटलं. सादर केलेली सर्वच जुनी अर्थातच अवीट गोडी असलेली भावगीतं, चित्रपटगीतं होती. आपले सर्व सभासदही ज्येष्ठ नागरिकच आहेत त्यामुळे ती गाणी आपल्या सर्व सभासदांना भावली. तरुणपणी भरभरून ऐकलेल्या गाण्यांनी जुने दिवस आठवले. गायिका सौ. संगीता कुलकर्णी यांनी गायलेल्या 'हसले मनी चांदणे' या गाण्याने श्रोत्यांची विशेष वाहवा मिळवली.

५०-६० वर्षापूर्वी आकाशवाणीवर सादर होणाऱ्या आपली आवड या मनपसंत कार्यक्रमाची आठवण झाली. सर्व सभासदांनी या कार्यक्रमाला मनापासून दाद दिली. शेवटी रुचकर अल्पोपहार होऊन या कार्यक्रमाची सांगता झाली.

**प्रज्ञा यार्दी**

## एक कप चहाचे प्रदूषण

नमस्कार मंडळी,

एका चहाच्या कपात केवढे तरी प्रदूषण आहे, पण आपला त्यावर सखोल अभ्यास नाही, म्हणून आपल्याला ते माहीत नाही. भारतातल्या प्रदूषणाबद्दल कार्य करणाऱ्या चार पैकी एक शास्त्रज्ञ डॉ. प्रमोद मोघे आपल्याला याबद्दल समजावून सांगायला आले. डॉ. प्रमोद मोघे, (वय ८१) राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा पुणे येथील शास्त्रज्ञ, ज्यांना ७ पारितोषिके व २२ सन्मानपदकं मिळाली आहेत, ज्यांच्या नावावर ४० प्रक्रियांचे पेटंट्स आहेत.

डॉ. मोघे यांनी खाद्यपदार्थ, तेले, शेती, औषधे, इंडस्ट्री, कापड व्यवसाय, जलसंपदा, रोजच्या वापरातील वस्तू, उदा. साबण, पेस्ट इत्यादी, अशा अनेक विषयांवरील प्रदूषणाचाअभ्यास केला आहे. कन्याकुमारी येथील विवेकानंद शिला स्मारकावर करण्यात आलेल्या लेपन प्रक्रियेच्या गटाचे ते प्रमुख होते. पण इतके असूनही साहित्य, कला, क्रीडा, संगीत, कथा कवितांचे लेखन अशी त्यांची चौफेर फलंदाजी चालू आहे. अग्निहोत्राचा ते हिरीरीने प्रचार करतात, कारण प्रदूषण हटविण्यात अग्निहोत्राचा खूप मोठा वाटा आहे, हे त्यांनी श्री. गोविंद गिरी महाराजांच्या समवेत सप्रयोग सिद्ध केले.

चहाला लागणारे पाणी, दूध, चहा पावडर, साखर या प्रत्येकाचे विश्लेषण करताना त्यांनी सांगितले की चहाच्या पानांवर आठ प्रकारची कीटकनाशकं मारली जातात. शिवाय चहाला चांगला रंग यावा म्हणून त्यावर रंग मारला जातो.

पाणी -पावसाचे जे पाणी, जमिनीवर पडते त्याचा पी.एच. ४ असतो, तो दूर करायला चुनखडी, तुरटी वापरावी लागते.ती किती टाकावी त्याचे नियम असतात, पण नियम केवळ कागदावर रहातात, आणि आपण आपल्या मनानेच कारभार करतो. पिण्याच्या पाण्यामुळे ८०% टक्के रोग होतात, अॅसीडिटीचे मुख्य कारणच क्लोरिन आहे.४०% कॅन्सर केसेसच्यामागे क्लोरीनयुक्त पाणी आहे. तुरटीमुळे डिमेंशिया होऊ शकतो. या वर उपाय म्हणजे पाणी उकळून घ्यावे. दुधाबाबत तर बोलायलाच नको. भारतातील दुधाच्या एकूण गरजेच्या दुधापैकी २०% दूध हे भेसळयुक्त असते कारण त्यात युरिया व वॉशिंग पावडरचे मिश्रण घातलेले असते. प्लास्टिकच्या पिशव्या दुधासाठी वापरतात, त्याही नियमाप्रमाणे नसतात. उसापासुन साखर तयार करण्यासाठी १६ प्रकारच्या प्रक्रिया कराव्या लागतात, त्याच्या प्रत्येक पायरीवर रसायने आहेतच. साखरेच्या शुद्धीकरणासाठी काय काय वापरले जाते हे ऐकले तर साखर खायची इच्छाच होणार नाही. तसेच चहाची गाळणी प्लास्टिकची वापरू नयेत, पातेले अॅल्युमिनीयमचे नको, कपबशा रंगीत नकोत.

या आणि अशा अनेक गोष्टींचे उलगडे डॉ. मोघे ह्यांनी आपल्या भाषणात केले आहेत. सर्व ऐकून श्रोते स्तब्ध झाले. रोज सकाळी अगदी आवडीने घेतला जाणारा चहा हा अमृततुल्य नसून केमिकलयुक्त आहे, याचे ज्ञान झाले. अतिशय अभ्यासपूर्ण असे हे भाषण ऐकूण सर्वांचे डोळे उघडले.

मग काय मंडळी चहाला केंव्हा येताय? असे कोणी विचारले तर या पुढे 'हो!' उत्तर टाळायलाच हवे.

अत्यंत ओघवत्या भाषेत सुधाताईंनी डॉ. मोघे यांची ओळख करून दिली. श्री. भुर्के यांनी हसत-खेळत आभाराचे भाषण केले, त्यामुळे चहाच्या कपाचा आलेला ताण हलका झाला.

नोव्हेंबर महिन्याच्या गटाने दिलेल्या भोजनाचा आस्वाद घेऊन मंडळी मार्गस्थ झाली.

**उज्वला नाईक**

### डिसेंबर महिन्यातील वाढदिवस
### जीवेत् शरदः शतम्

| | |
|---|---|
| डॉ. राधा संगमनेरकर | ३ डिसें. |
| सौ. नीना खरे | ४ डिसें. |
| श्रीमती सुधा जावडेकर | २१ डिसें. |
| सौ. आरती जव्हेरी | २८ डिसें. |